**दुष्काळ, पाणी टंचाई आणि वाढत्या उष्णतेवर नियंत्रणासाठी लातूर जिल्ह्यात 'अमृतधारा अभियान' राबविणे बाबत.**

# परिपत्रक

**जा.क्र.२०२५/वृक्ष लागवड/रोहयो/कक्ष-२/कावि-१८० जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर दि. ०७/०४/२०२५.**

**प्रस्तावना :**

सध्या संपूर्ण देशासह लातूर जिल्ह्यातही वातावरणीय बदलांचे गंभीर परिणाम प्रकर्षाने जाणवू लागले आहेत. दिवसेंदिवस वाढणारी उष्णता, दिर्घकाळ रहात असलेली उष्णतेची लाट, पर्जन्यमानातील अनियमितता, भूजल पातळीतील सातत्याने होणारी घट आणि त्यामुळे निर्माण होणारी पाणीटंचाई ही गंभीर आव्हाने ठरत आहेत. या संकटांचा प्रभाव आरोग्य, शेती, उपजिविका आणि संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होत आहे.

मराठवाडयातील लातूर जिल्हा, हा विषमं हवामान असलेला आणि अर्ध-शुष्क (semi-arid) क्षेत्रात मोडतो. येथे उन्हाळ्यात तापमान ४२°C पर्यंत जाते. काही वर्षांत ४७°C पर्यंतही तापमान नोंदवले गेले आहे, जे भारताच्या सरासरी पेक्षा जास्त आहे. लातूर, मराठवाड्यातील सर्वाधिक उष्ण जिल्ह्यांपैकी एक आहे. येथील तापमान विदर्भाच्या तुलनेत थोडं कमी, पण पश्चिम महाराष्ट्र किंवा कोकणच्या तुलनेत जास्त असते. सध्या लातूर जिल्ह्यात वाढत्या उष्णतेच्या लाटांमुळे निर्माण होणाऱ्या संकटांचा सामना करण्यासाठी तातडीने आणि दिर्घकालीन उपाययोजना राबविण्याची गरज निर्माण झाली आहे.

याच पार्श्वभूमीवर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत "उष्णतेशी लढा!" या विषयावर जिल्हा स्तरावरील कार्यशाळा पहिल्यांदाच लातूर येथे आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत पर्यावरण, वास्तुविशारद, सार्वजनिक आरोग्य व जलव्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञांनी सहभाग घेतला.

कार्यशाळेत झालेल्या विचारमंथनातून वाढत्या उष्णतेवर नियंत्रण ठेवण्यासाठी जलसंवर्धन, रेन वॉटर हार्वेस्टिंग, वृक्ष लागवड, ग्रीन बिल्डिंग संकल्पना व जनजागृती यावर भर देण्याची गरज अधोरेखीत करण्यात आली. या दिशेने प्रभावी पावले उचलण्यासाठी "अमृतधारा अभियान" हाती घेण्याबाबत मा.जिल्हाधिकारी, लातूर यांनी घोषणा केली होती, या अभियानाअंतर्गत जिल्ह्यातील सर्व शासकीय तसेच खासगी इमारतींवर 'रुफ वॉटर हार्वेस्टिंग' प्रणालीची अंमलबजावणी, पाणवठे तयार करणे, पावसाचे पाणी जमिनीत मुरविणे, "जलतारा" कामे, बांबू व ईतर वृक्ष लागवड, विहीर पुनर्भरण , Catch the rain, गाळ काढणे , माथा ते पायथा आदी जलसंधारणाशी निगडीत उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

जिल्हा प्रशासनाने 'अमृतधारा' हे विशेष अभियान हाती घेण्याचा मुख्य उद्देश पावसाचे पाणी जास्तीत जास्त प्रमाणात जमिनीत मुरवणे, भूजल पुनर्भरणास चालना देणे, शाश्वत जलव्यवस्थापन, तसेच पर्यावरणीय समतोल साधून उष्णतेच्या लाटेचे परिणाम कमी करणे त्याच बरोबर जिल्ह्यातील हरितक्षेत्र वाढविणे हा आहे. जलसंधारण कामे, वृक्ष लागवड आणि लोकसहभाग या तीन प्रमुख आधारस्तंभांवर आधारित हे अभियान लातूर जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.या अभियानामार्फत केवळ तात्कालिक उपाययोजनाच (Short-Term Measures) नव्हे तर दीर्घकालीन शाश्वत विकासाची दिशा (Direction for long-term sustainable development) ठरविण्याचा प्रयत्न केला जाणार असून, महसुल विभाग, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, वन विभाग, सामाजिक वनीकरण विभाग, कृषी विभाग, आत्मा, जलसंधारण, जलसंपदा विभाग, शिक्षण विभाग, महानगर पालिका, नगर परीषद / पंचायत, नियोजन विभाग, भू-जल सर्वेक्षण विभाग, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, पशुसंवर्धन , सार्वजनिक बांधकाम विभाग, शाळा महाविद्यालये, अशासकीय संस्था, शासकीय संस्था, विविध वृक्ष प्रेमी संघटना, पर्यावरण तज्ञ, उद्योग व नागरीक व विद्यार्थी यांचा सक्रीय सहभाग अत्यावश्यक आहे. त्याची रूपरेषा खालील प्रमाणे या परिपत्रकाद्वारे निर्गमित करण्यात येत आहे.

# अमृतधारा अभियान

## एप्रिल, मे, जून, जुलैसाठी कालबद्ध आराखडा

**1) एप्रिल महिन्यातील करावयाची कामे.**

- रेन वॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा तपासणी व दुरुस्ती/नवीन यंत्रणा बसवणे.
- वृक्षलागवडीसाठी जागा निश्चिती व खड्डे खोदण्याचे नियोजन करणे.
- ग्रामीण व शहरी भागात विहिर पुनर्भरणचे उद्दिष्ट निश्चित करणे.
- तलाव, विहिरींचे सर्वेक्षण व पुनर्भरण आराखडा तयार करणे
- पाझर तलाव तुट – फूट लिकेज दुरुस्ती करणे.
- बांबू लागवड, वृक्ष लागवड,"जलतारा", विहीर पुनर्भरण कामांसाठी रोहयो अंतर्गत नियोजन करणे.
- शहरी, ग्रामीण भागात पाणवठे तयार करणे.
- तलावातील गाळ काढणे.
- जलसंधारणासाठी माथा ते पायथा कामे करुन घेणे.
- शासकीय कार्यालय, अशासकीय/शैक्षणीक संस्था,वृक्षप्रेमी संघटना व नागरीक यांनी जलसंधारण कामे व वृक्ष लागवडीचे नियोजन करावे.
- शाळा/महाविद्यालयांमध्ये कार्यशाळा घेणे.
- जनजागृती मोहीमेस प्रारंभ – (पोस्टर्स, सोशल मिडिया व ईतर माध्यमे )
- सोशल मिडियावर **#AmrutdharaChallenge** सुरु करणे.

**2) मे महिन्यात करावयाची कामे.**

- बांबू लागवड, वृक्ष लागवड,"जलतारा",विहीर पुनर्भरण कामांसाठी रोहयो अंतर्गत प्र.मा.देणे.
- सर्व इमारतींवर रेन / रुफ वॉटर हार्वेस्टिंग प्रणालींची अंमलबजावणी करणे.
- वृक्षलागवड गट तयार करणे व रोपे , बिया जमा करणे, सिड बँक तयार करणे.
- वृक्ष लागवडीसाठी निश्चित केलेल्या जागी खड्डे तयार करुन घेणे.
- "माझ गाव – टँकरमुक्त व हरीत गाव" जनजागृती मोहीम राबविणे.

**3) जुन, जूलै व ऑगस्ट महिन्यात करावयाची कामे.**

- बांबू लागवड, वृक्ष लागवड,"जलतारा",विहीर पुनर्भरण इ.कामांना कार्यारंभ आदेश देणे.
- तालुका स्तरावर वृक्षलागवड मोहीम घेणे (शाळा, महाविद्यालये,कार्यालये, शासकीय खुल्या जागांवर)
- रुफ / रेन वॉटर हार्वेस्टिंग यंत्रणांचा थेट वापर सुरू करणे.
- पावसाचे पाणी अडवण्यासाठी छोटे प्रकल्प/बंधारे सुरू करणे.
- "एक व्यक्ती - एक झाड" मोहीम नागरीकांसमवेत राबविणे.
- शैक्षणिक संस्थेअंतर्गत व सार्वजनिक निवडलेल्या जागी वृक्षलागवड कार्यक्रम राबविणे.
- वृक्षांचे पालकत्व घेण्यासाठी मोहीम राबविणे (Tree Adoption Campaign).

**अमृतधारा अभियान – उपविभागस्तरीय समन्वय समिती.**

अमृतधारा अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक उप विभाग स्तरावर समन्वय समिती स्थापन करण्यात येत आहे. ही समिती परीपत्रकानुसार नियोजन, अंमलबजावणी व समन्वय यासाठी कार्यरत राहील.

**समितीची रचना**

1) उपविभागीय अधिकारी – अध्यक्ष.
2) तहसीलदार – सदस्य.
3) उप अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, - सदस्य.
4) उप अभियंता, पाटबंधारे विभाग क्रं.०१ – सदस्य.
5) उप अभियंता, पाटबंधारे विभाग क्रं.०२ – सदस्य.
6) तालुका कृषी अधिकारी – सदस्य.
7) वन विभाग अधिकारी – सदस्य.
8) सामाजिक वनीकरण अधिकारी – सदस्य.
9) उप अभियंता (सा.बां.विभाग) – सदस्य.
10) शिक्षणाधिकारी – सदस्य.
11) निवडक अशासकीय संस्था प्रतिनिधी सदस्य.
12) गट विकास अधिकारी – सचिव (ग्रामीण भागासाठी).
13) मुख्याधिकारी – सचिव (शहरी भागासाठी).

**समितीची जबाबदारी**

१) प्रत्येक गावासाठी जलसंधारण, विहिर पुनर्भरण, वृक्षलागवड आराखडा तयार करणे.
२) प्रत्येक शासकीय इमारतींवर रेन वॉटर हार्वेस्टिंगची अंमलबजावणी करणे.
३) वृक्षलागवडीसाठी जागांची निश्चिती व रोपांची उपलब्धता करुन घेणे.
४) जनजागृती उपक्रम राबवण्यासाठी वेळापत्रक तयार करणे.
५) अमृतधारा अभियान राबविणेसाठी सर्व शासकीय विभाग, अशासकीय संस्था, नागरीक यांच्यात समन्वय राखणे.
६) साप्ताहिक आढावा बैठक घेऊन कामाच्या प्रगतीची नोंद ठेवणे.
७) जिल्हास्तरावरील परिपत्रकानुसार अहवाल सादर करणे.

वरील समितीने एकत्रितपणे कार्य करून 'अमृतधारा अभियान' यशस्वी करण्यासाठी व लातूर जिल्ह्याचे वृक्ष लागवडीद्वारे हरितक्षेत्र व जलसंधारण कामांद्वारे भूजल पातळी वाढविण्यासाठी योग्य नियोजन करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी.

**अमृतधारा अभियान – जिल्हास्तरीय समन्वय समिती.**

अमृतधारा अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर समन्वय समिती स्थापन करण्यात येत आहे. ही समिती परीपत्रकानुसार नियोजन, अंमलबजावणी व समन्वय यासाठी कार्यरत राहील.

**समितीची रचना**

1) जिल्हाधिकारी – अध्यक्ष
2) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद – सह अध्यक्ष.
3) उपजिल्हाधिकारी (रोहयो) – सदस्य
4) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी – सदस्य.
5) कार्यकारी अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, - सदस्य.
6) कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग क्रं.०१ – सदस्य.
7) कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग क्रं.०२ – सदस्य.

8) सहाय्यक वन संरक्षक वन विभाग – सदस्य

9) सहाय्यक वन संरक्षक सामाजिक वनीकरण विभाग – सदस्य

10) शिक्षणाधिकारी प्राथमिक, माध्यमिक – सदस्य.

11) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विभाग – सदस्य.

12) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं), जि.प. – सचिव ( ग्रामीण भागासाठी )

13) सहा.आयुक्त न.पा.प्र. – सचिव ( शहरी भागासाठी )

जिल्हास्तरीय समिती मार्फत सर्व संबंधीत विभागाचा अभियानाच्या उद्दिष्ट पुर्तते बाबत वेळोवेळी आढावा बैठक घेण्यात येईल याची सर्व संबंधित विभागांनी नोंद घ्यावी. सदरील अभियानात उप विभाग समितीने सर्व शासकीय कार्यालय प्रमुख, विविध अशासकीय संस्था, शैक्षणिक संस्था, वृक्षप्रेमी संघटना, नागरीक व विद्यार्थी यांना अभियानाचे पूर्ण नियोजन करुन सहभागी करुन घ्यावे.

अमृतधारा अभिनाअंतर्गत उत्कृष्ठ काम करणारे अधिकारी , कर्मचारी , अशासकीय संस्था , शैक्षणिक संस्था , वृक्षप्रेमी संघटना, नागरीक व विद्यार्थी यांचा दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी मा.पालकमंत्री, लातूर यांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे. अमृतधारा अभियानात सर्व शासकीय कार्यालये , अशासकीय संस्था , नागरीक यांनी आपला उत्सफूर्त सहभाग नोंदवावा.

**सोबत :- अमृतधारा अभियान उद्दिष्ट विवरणपत्र.**

**वर्षा ठाकूर – घुगे (भा.प्र.से)**
**जिल्हाधिकारी, लातूर.**

**प्रतिलिपी, माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव.**

**1)** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर.

**2)** पोलिस अधिक्षक, लातूर.

**3)** सर्व संबंधित जिल्हास्तरीय विभाग प्रमुख, जि.लातूर.

**4)** सर्व उप विभागीय अधिकारी, जि.लातूर.

**5)** सर्व तहसीलदार, जि.लातूर.

**6)** सर्व गट विकास अधिकारी, जि.लातूर.

**7)** सर्व मुख्याधिकारी, जि.लातूर.

**8)** उपजिल्हाधिकारी (रोहयो).

**9)** जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी.

**10)** सहाय्यक वन संरक्षक वन विभाग.

**11)** सहाय्यक वन संरक्षक सामाजिक वनीकरण विभाग.

**12)** कार्यकारी अभियंता, मृद व जलसंधारण विभाग.

**13)** कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग क्रं.०१.

**14)** कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग क्रं.०२.

**15)** शिक्षणाधिकारी प्राथमिक, माध्यमिक.

**16)** वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विभाग.

**17)** उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं), जि.प. – सचिव ( ग्रामीण भागासाठी).

**18)** सहा.आयुक्त न.पा.प्र. – सचिव ( शहरी भागासाठी).

**19)** ............................................................, लातूर.

# अमृतधारा अभियान - उदिष्ट विवरणपत्र जि. लातूर

| अ.क्र. | विभागाचे नाव | कामाचे स्वरूप व उदिष्ट | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विहिर पुनर्भरण | Rain / रूफ वॉटर हार्वेस्टिंग | जलतारा | वृक्षलागवड | पाझर तलाव दुरूस्ती | गाळ काढणे | बांबु लागवड | पाणवठे |
| 1 | जिल्हा परिषद | 5000 | 20000 | 10000 | 45 लक्ष | - | - | 10000 हे. | 300 |
| 2 | कृषी विभाग | 5000 | 50 | 10000 | 2 लक्ष | - | - | 10000 हे. | 100 |
| 3 | मृद व जलसंधारण | - | 50 | - | 5 हजार | 22 | 921700 घ.मी. | 5000 हे. | - |
| 4 | लघुपाटबंधारे क्र. 01 | - | 50 | - | 5 हजार | 12 | 1270139 घ.मी. | 5000 हे. | - |
| 5 | लघुपाटबंधारे क्र. 02 | - | 50 | - | 5 हजार | 7 | 3049686 घ.मी. | 5000 हे. | - |
| 6 | माध्यमिक शिक्षण विभाग | - | 500 | - | 2 हजार | - | - | - | 150 |
| 7 | प्राथमिक शिक्षण विभाग | - | 1000 | - | 2 हजार | - | - | - | - |
| 8 | वन विभाग | - | 10 | - | 7 लक्ष | - | - | 500 हे. | - |
| 9 | सामाजिक वनीकरण | - | - | - | 4 लक्ष | - | - | 3000 हे. | 300 |
| 10 | सार्वजनिक बांधकाम विभाग | - | 1000 | - | 2 लक्ष | - | - | - | - |
| 11 | नगर पालिका प्रशासन | 2000 | 10000 | - | 50 हजार | - | - | - | 200 |
| **एकुण** | | **10000** | **32710** | **20000** | **129 हजार** | **41** | **5241525 घ.मी** | **38500 हे.** | **1050** |